# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद



## दिनांक १५/०७/२०१९ रोजी (का.प.क्र.०३) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

सोमवार दिनांक १५/०७/२०१९ रोजी (का.प.क्र.०३) मा.सभापती श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी ०१:१० वाजता वंदेमातरम् या गीताने सुरु झाली. सभेला मा.उपआयुक्त (श्री.डी.पी.कुलकर्णी), नगर सचिव, श्री.डि.डि.सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थित स.सदस्यांची नांवे |
|---|---|
| ०१. | स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ०२. | स.स.श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे |
| ०३. | स.स.श्री.पुनमचंद सोनाजी बमणे |
| ०४. | स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान |
| ०५. | स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर |
| ०६. | स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशिद |
| ०७. | स.स.श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| ०८. | स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप |
| ०९. | स.स.श्रीमती सिमा कहानुलाल चक्रनारायण |
| १०. | स.स.श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ |
| ११. | स.स.श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| १२. | स.स.श्री.नासेर तकिउद्दीन सिद्दीकी |
| १३. | स.स.श्रीमती सय्यद सरवत बेगम आरेफ हुसैनी |

श्रीमती.शिल्पाराणी वाडकरः माझ्या वार्डामध्ये १५० लाईट बंद आहे आणि एलईडी चे काम सुध्दा बंद आहे. कॉन्ट्रॅक्टर काम करणार नसतील तर त्यांच्यावर काय कारवाई करणार आहोत.

श्री.नासेर सिद्दिकी : पुर्ण शहरामध्ये १० हजार लाईट बंद आहे. विद्युत विभागाचे पुर्ण काम ठप्प पडलेले आहे. एलईडी वाल्याचा पैसा थांबवण्यात आला पाहिजे.

श्री.गजानन बारवाल : पुर्ण शहरामध्ये मेन्टेनसचे काम होत नाही. एलईडीचे काम होत नाही. ठेकेदाराला पैसे मिळालेले नाही म्हणुन काम बंद आहे. याचे कारण काय आहे ते विचारण्यात यावे.

श्री.राजेंद्र जंजाळ : वार्डामध्ये एलईडीचे लाईट लावल्या नंतर चौथ्या दिवशी ते लाईट बंद पडतात. लाईटची क्वॉलिटी बरोबर नाही. माहिती मिळाली होती की, महानगरपालिकेच्या विद्युत विभागाने त्याच्यावर शेरा मारला होता की, यांना पेमेंट देण्यात येऊ नये तरी सुध्दा अकाऊंट विभागाने २५ कोटी रु. पेमेंट त्यांना अदा केलेले आहे. याचा ही खुलासा होणे गरजेचे आहे. लाईट क्वॉलिटी ज्यावर आयएसओ मार्क असतील ते बघण्यात आले होते का? विद्युत विभागाच्या गोडाऊनला आग लागली होती. आग लागली म्हणुन आमच्याकडे सध्या लाईट नाही असे सांगतात. जेव्हा संबंधीत अधिकारी म्हणतात की यांना पेमेंट देणे योग्य होणार नाही तेव्हा कोणत्या अधिकाराने आणि कोणत्या नियमाखाली अकाऊंट विभागाने यांना पेमेंट केले. याचा खुलासा घेण्यात यावा.

श्री.सचिन खैरे : वार्डातील लाईट चार दिवसात बंद पडतात. त्यांची फिटिंग व्यवस्थित केलेली नाही. मेन्टेनसचे काम केले जात नाही.

श्रीमती.सुरेखा सानप : पंधरा दिवसापासुन मेन्टेनससाठी सांगितले होते अजुन सुध्दा मेन्टेनस करण्यात आले नाही. अधिकाऱ्यांना फोन केल्यावर उडवा-उडवीचे उत्तरे देतात. नारेगाव स्मशान भुमी येथील लाईटसाठी सहा महिन्यापासुन सांगत आहे, एमईसीबीने पोल फिटींग करुन दिले आहे परंतु विद्युत विभागाने अजुन पर्यंत लाईट लावुन दिलेले नाही.

श्रीमती.सीमा चक्रनारायण: एक महिन्यापासुन वार्डामध्ये एलईडीचे लाईट बंद आहे. एलईडी बाबत निर्णय घेण्यात यावा.

श्री.अब्दुल नाविद : वार्डातील लाईटच्या बद्दल संबंधीत अधिकारी यांना वारंवार तक्रार करुन सुध्दा काम करत नाही. एलईडीला पेमेंट केल्यावर सुध्दा काम होत नाही.

श्री.कमलाकर जगताप : सातारा देवळाई जालना रोडवर हायमास्ट एकही चालु नाही. हायमास्ट चालु करण्यासाठी सुचना करण्यात यावी.

मा.सभापती : संबंधीत अधिकाऱ्यांनी प्रत्येक सदस्यांच्या समस्येचा खुलासा करावा.

का.अभियंता(श्री.देशमुख): चार्ज घेऊन तीन-चार दिवस झाले आहे. एलईडी बाबत पुर्ण अभ्यास झालेला नाही. पुढच्या बैठकीत सविस्तर माहिती देण्यात येईल.

मा.सभापती : काम किती दिवसात होईल ते सांगण्यात यावे.

श्री.गजानन बारवाल : शहरामध्ये किती लाईट लावण्यात आले त्याचा माहिती देण्यात यावा.

का.अभियंता(श्री.देशमुख): एलईडीचे ४० हजार पैकी ३१३५२ दिवे लावलेले आहे. आणि हायमास्ट मेन्टेनस कंपनीकडे आहे.

मा.सभापती : जुने लाईटचे मेन्टेनस तरी झाले पाहिजे.

का.अभियंता(श्री.देशमुख): कॉन्ट्रक्टरचे पेमेंट अडकल्यामुळे कोणतेच कॉन्ट्रॅक्टर काम करण्यात तयार नाही. आणि जे कॉन्ट्रॅक्टर पेमेंट करुन सुध्दा काम करत नसतील त्यावर नियमानुसार कारवाई करु.

श्री.अब्दुल नाविद : ज्या एजन्सीला मेन्टेनसच्या कामासाठी वर्कऑर्डर दिलेली आहे त्याचे काय?

मा.सभापती : मेन्टेनसचे काय झाले? खुलासा करावा.

का.अभियंता(श्री.देशमुख): जे कॉन्ट्रॅक्टर मेन्टेनसचे काम करत नसतील त्यावर नियमानुसार कारवाई करु.

श्रीमती.सत्यभामा शिंदे : आमदार निधीतुन वर्कऑर्डर का करु शकत नाही. पाच लाखाची हायमास्टची फाईल पेंडींग आहे.

का.अभियंता(श्री.देशमुख): काय आहे ते बघुन घेतो.

मा.सभापती : विषय खुप मोठा आहे याबाबत एलईडीची एक विशेष बैठक लावण्यात यावी.

श्री.राजेंद्र जंजाळ : जेव्हा विद्युत विभागाने सांगितले की पेमेंट करु नका मग अकाऊंट विभागाने कसे पेमेंट केले याचा खुलासा घेण्यात यावा.

मा.सभापती : अकाऊंट अधिकारी यांनी याचा खुलासा करावा.

लेखाधिकारी(श्री.पाटणी): एलईडीच्या बाबतीत आताच चार्ज घेतलेला आहे. एलईडीचे पेमेंट करु नये अशा कोणत्याच सुचना विद्युत विभागाकडुन मिळालेल्या नाहीत.

श्री.राजेंद्र जंजाळ : फाईल चेक करुन घेण्यात यावी आणि त्याची एक कॉफी सदस्यांना देण्यात यावी.

श्री.नासेर सिद्दिकी : दोन दिवसा अगोदर पेपरमध्ये बातमी आली होती की, तीन कोटी रु. पेमेंट यांच्याकडुन रिलीज झाले. ते कोणाच्या सांगण्यावरुन कोणाला देण्यात आले याचा खुलासा करण्यात यावा.

लेखाधिकारी(श्री.पाटणी): तो बांधील खर्च आहे. त्यामध्ये बचत गट-८३ लाख, गार्डन-८ लाख ८५ हजार, नॉलेजींग-३५ लाख, वेल्थ विंग सोल्युशन-२० लाख ३४ हजार, टँकर-११ लाख ३३ हजार, महाराणा-६६ लाख आणि नाले सफाईसाठी-१७ लाख अशा पध्दतीने खर्च केलेला आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ : यामध्ये सिनियॉरीटी काय आहे ते सांगण्यात यावे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर: महाराणा एजन्सीला जे पेमेंट केले. जे तीनशे-चारशे कर्मचारी आहेत त्यांच्या कामाचा काही आढावा आहे का? त्यांचे काहीच काम दिसुन येत नाही.

श्री.नासेर सिद्दिकी : वेळेवर पेमेंट मिळत नसल्यामुळे महाराणा एजन्सीचे काही कर्मचारी काम सोडुन गेले आहेत. त्यांच्या नावावर आजुनही एजन्सी पेमेंट उचलत आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ : यामध्ये नॉलेजींग काय आहे.

लेखाधिकारी (श्री.पाटणी) : नॉलेजींग संदर्भात श्री.भोंबे यांना माहिती आहे.

कक्ष प्रमुख (घनकचरा) : एमजीएम मार्फत जी कचऱ्यावर बायो कलचर प्रक्रिया होती ती कांचनवाडी, पडेगाव, चिकलठाणा आणि हर्सुल जे आहे त्यासाठी ते पैसे आकारतात. सेंट्रल नाक्याचे त्यांनी सिएसआर मधुन केले होते.

श्री.राजेंद्र जंजाळ : पडेगावमध्ये कुठे कचरा होता, हर्सुलला जी मशिनरी बसवली त्याचे काम चालु नव्हते का?

कक्ष प्रमुख(घनकचरा) : डम्पवेट जे पडलेले आहे त्याच्या वरच बायो कलचर आहे. टेंडर प्रक्रियेसाठी त्याचा एमओयु झालेला आहे. मान्यतेसाठी स्थायी समिती समोर ठेवायचा आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ : हे सगळे पेमेंट काढतांना कोणता कायदा लागु केला होता. जर सदस्यांच्या वार्डातले विकास कामांचे पेमेंट होत नसेल आणि ज्याला कोणतीच मान्यता नसेल असे पेमेंट होत असेल तर तर नेमक अकाऊंट विभागाचे धोरण काय आहे? कोणाच्या आदेशाने त्याचे पेमेंट काढले गेले.

लेखाधिकारी(श्री.पाटणी): हा खर्च बांधील खर्चामध्ये येतो. नियमीत पेमेंट या पध्दतीने करत असतो.

श्री.नासेर सिद्दिकी : जेवढे बांधील खर्च राहतील ते सर्व स्थायी समितीच्या समोर आले पाहिजे तर पेमेंट काढले पाहिजे.

श्री.राजेंद्र जंजाळ : कोणत्या नियमाने आणि कोणी अधिकार दिले हे पैसे खर्च करायचे?

लेखाधिकारी(श्री.पाटणी): विविध विभागाकडुन मंजुर म्हणुन आमच्याकडे आलेले असतात.

श्री.राजेंद्र जंजाळ : बांधील खर्चामध्ये विथआऊट टेंडर कसे घेतात ते सांगावे. बांधील खर्चाची अर्थसंकल्पामध्ये मान्यता आहे.

लेखाधिकारी(श्री.पाटणी): श्री.भोंबे यांनी सांगितल्या प्रमाणे त्याचा एमओयु मा.आयुक्तांबरोबर झालेला आहे. त्यांनी मा.आयुक्तांच्या मान्यतेने प्रमाणित करुन दिलेले आहे म्हणुन पेमेंट केलेले आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ : एमओयु बनवतांना अशा पध्दतीने विथआऊट टेंडर काम देण्याचा अधिकार आहे का? कोणताही एमओयु करायचा असेल तर सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी लागेल.

कक्ष प्रमुख(घनकचरा) : एमजीएम मार्फत जो बायोकलचरचा विषय आहे ते फक्त मा.आयुक्तांच्या सहीने झालेले आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ : मान्यतेसाठी सर्वसाधारण सभेसमोर आणला का? हे योग्य आहे का याकरिता विधी सल्लागारांकडुन याचा खुलासा घेण्यात यावा की, एमओयु मध्ये विथआऊट टेंडर साडे तीन लाख रु. पेक्षा जास्त रक्कमेच्या मान्यता नसल्यावर देता येतो का?

विधी सल्लागार : याबाबत माहिती नाही. परंतु मा.आयुक्तांचे स्वतंत्र अधिकार आहेत. आणि स्थायी समिती समोर मान्य करतो.

श्री.राजेंद्र जंजाळ : जो एमओयु केलेला आहे तो ६७ (३) 'क' मध्ये केलेला आहे का?

विधी सल्लागार : पुर्ण माहिती नाही, तपासुन सांगते.

श्री.राजेंद्र जंजाळ : पुढच्या बैठकीपर्यंत नियमानुसार सविस्तर माहिती देण्यात यावी.

श्री.नासेर सिद्दिकी : ६६ लाख रुपये जे महाराणा एजन्सीला पेमेंट केले आहे त्याचा खुलासा करण्यात यावा. किती कर्मचारी काम करतात, कोणत्या आधारावर एजन्सीला पेमेंट केले आहे.

लेखाधिकारी(श्री.पाटणी): महाराणा एजन्सीचे लेखा विभागामध्ये साडे तीन कोटीचे देयक प्रलंबित आहेत, पेमेंट देणे बाकी आहे.

मा.सभापती : दोन्ही विषयाचा लेखी निवेदन माझ्याकडे देण्यात यावा.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकरः संत एकनाथ रंगमंदीरच्या बाजुला ओम ऑप्टीकल्सच्या बिल्डींगवर टॉवर्स आहे. टॉवर्स वाल्याने रितसर परवानगी घेतलेली आहे का?

श्री.गजानन बारवाल : ओम ऑप्टीकल्सच्या ठिकाणी जागा महापालिकेची आहे. अन्डर ग्राउंडला पार्किंग सुध्दा आहे. त्याचा वापर महापालिका करत नाही. याची माहिती देण्यात यावी.

नगररचना(श्री.देशमुख) : पार्किंगच्या वापरा बद्दल मालमत्ता अधिकाऱ्यांना माहिती असते आणि मोबाईल टॉवर्सची परमिशन झालेली नाही.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर: आदेशित करण्यात यावे टॉवर्स इल्लिगल आहे, सिल करण्यात यावे.

| | |
|---|---|
| कार्य.अभियंता(अति) | : टॉवर्स इल्लिगल असेल तर लगेच कार्यवाही करण्यात येईल. |
| श्रीमती.सुरेखा सानप | : वार्डामध्ये कचरा डेपोच्या बाजुला बांधकाम चालु आहे. त्याला बांधकाम परवानगी आहे का ते विचारण्यात यावे. राजनगड नगरमध्ये इल्लिगल बांधकाम झालेले आहे. |
| कार्य.अभियंता(अति) | : जिथे बांधकाम चालु आहे तिथे बिल्डींग इनस्पेक्टरला पाठवुन बांधकाम बंद करायला लावतो. |
| श्री.अब्दुल नाविद | : वार्डामध्ये खुप दुषित पाणी येत आहे. वेळेवर पाणी येत नाही. अधिकारी काम करण्यास सक्षम दिसत नाही. |
| मा.सभापती | : नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न आहे. दुषित पाण्या संदर्भात खुलासा करावा. |
| उपअभियंता(पा.पु) | : दुषित पाण्याच्या बाबतीत तिथे ड्रेनेज वाल्यांचा प्रॉब्लेम आहे. ड्रेनेजचे अभियंता आणि मी जाऊन स्वतः पाहणी करतो. |
| श्री.अब्दुल नाविद | : वार्डामध्ये बनेवाडी आणि राहुल नगर भाग आहे. या दोन्ही भागाच्या सेंटर मध्ये रेल्वेची लाईन आहे. वॉटर लाईन क्रॉस कनेक्शन साठी अनेक वेळा सांगितलेले आहे. पत्र दिले आहे पण श्री.कोल्हे साहेबांनी यावर अद्याप काही कार्यवाही केलेली नाही. |
| कार्य.अभियंता(पा.पु) | : रेल्वेकडे क्रॉसिंगसाठी परमिशनला टाकलेला आहे. त्याचा मेल सुध्दा आलेला आहे. त्याच्या फॉलोअप मध्ये आहेत परमिशन मिळाली की कामाला सुरुवात करणार आहोत. |
| मा.सभापती | : लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी. |
| श्रीमती.सत्यभामा शिंदे | : माझ्या वार्डात आठव्या दिवशी पाणी येत आहे. नागरीक पाण्यावाचून त्रस्त झाले आहे. |
| कार्य.अभियंता(पा.पु) | : पुढच्या टर्मला पाचव्या दिवशी पाणी येईल. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | : समान पाणी वाटप करण्यात यावा आणि समान वसुली सुध्दा करण्यात यावी. वार्डात दुषित पाणी येत आहे. |
| कार्य.अभियंता(पा.पु) | : वसुली हा माझा भाग नाही. दुषित पाण्यासंदर्भात कार्यवाही तात्काळ करतो. |
| श्री.नासेर सिद्दिकी | : समान पाणी वाटप होणार आहे का? |
| कार्य.अभियंता(पा.पु) | : दोन टर्म नंतर समान पाणी वाटप होईल. |
| मा.सभापती | : समान पाणी वाटप जे करणार आहोत त्यास सर्व नगरसेवक, सर्व नागरीक प्रशासनाला मदत करण्यास तयार आहेत. समान पाणी वाटप लवकरात लवकर करण्यात यावा. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | : पाणी पुरवठ्याची विशेष बैठक मा.आयुक्तांच्या उपस्थितीत लावण्यात यावी. |
| श्रीमती.सत्यभामा शिंदे | : भुमिगत ड्रेनेज लाईनच्या बाबतीत वार्डात चार ठिकाणी भुमिगत ड्रेनेज पाईप लाईन टाकलेली नाही. पावसामुळे नागरीकांच्या घरामध्ये पाणी गेले आहे. ड्रेनेज पाईप कधी जोडणार आहात. |
| मा.सभापती | : वार्ड अभियंता याबाबत खुलासा करावा. |
| वार्ड अभियंता(ड्रेनेज) | : उद्या जाऊन जागा पाहणी करुन घेतो. |
| मा.सभापती | : या बाबतीत त्वरित कार्यवाही करण्यात यावी. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | : पेपरमध्ये बातमी आहे की, महापालिकेच्या शाळेमधील वर्ग रिकाम्या करुन वेग-वेगळ्या तुकडीच्या विद्यार्थ्यांना एका हॉलमध्ये बसुन शिकवले जात आहे. याचा खुलासा करण्यात यावा. |
| शिक्षणाधिकारी | : एन-११ च्या शाळेमध्ये विद्यार्थी संख्या कमी आहे. त्यासाठी दोन वर्ग वापरतो. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | : त्या विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी किती शिक्षक आहेत. |
| शिक्षणाधिकारी | : तीस विद्यार्थ्यांना एक शिक्षक देता येतो परंतु तिथे विद्यार्थी संख्या कमी असल्यामुळे दोन शिक्षक दिलेले आहेत. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | : ज्या महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी संख्या कमी असेल तेथील विद्यार्थ्यांना दुसऱ्या महापालिकेच्या शाळेमध्ये शिफ्ट करण्यात यावे. |
| मा.सभापती | : या विषया संदर्भात त्वरित कार्यवाही करावी. विषयपत्रिकेला सुरुवात करण्यात येते. |

**विषय क्र. ०३ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शासकीय अनुदानातील रक्कम रूपये १०० कोटी व डीफर पेमेंट रक्कम रू.५० कोटीच्या रस्त्यांचे कामामध्ये बाधीत होणाऱ्या Utility Services स्थलांतरीत करणे कामी निराला बाजार ते खडकेश्वर म.न.पा. गेट पर्यंत रस्त्यामधील निराला बाजार ते नागेश्वरवाडी मंदिर पर्यंत रस्त्यामध्ये ४०० मीमी, १५० मीमी व १०० मीमी व्यासाच्या जलवाहिन्या बाधीत आहेत. त्यापैकी ४०० मीमी व्यासाची व १५० मीमी व्यासाच्या Existing pipe line ह्या अे.सी. च्या आहेत त्या स्थलांतरीत होणार नाही त्यासाठी ४०० मीमी व १५० मीमी व्यासाच्या नविन डी.आय.के.-७ जलवाहीनी टाकणे आवश्यक आहेत तसेच १०० मीमी व्यासाची Existing pipe line डी.आय.के.-७ असल्याने ती स्थलांतरीत करता येईल.

उपरोक्त जलवाहीनीची कामे करणे अत्यावश्यक असल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील सन २०१८-२०१९ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार केले असून अंदाजपत्रक रक्कम रूपये २५,४३,२९३/- इतके आहे. करीता सदरील रक्कमेच्या खर्चास मान्यतेस्तव तथा विचारार्थ प्रस्ताव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासकीय अनुदानातील रक्कम रूपये १०० कोटी व डीफर पेमेंट रक्कम रू.५० कोटीच्या रस्त्यांचे कामामध्ये बाधीत होणाऱ्या Utility Services स्थलांतरीत करणे कामी निराला बाजार ते खडकेश्वर म.न.पा. गेट पर्यंत रस्त्यामधील निराला बाजार ते नागेश्वरवाडी मंदिर पर्यंत रस्त्यामध्ये बाधीत ४०० मीमी व १५० मीमी व्यासाच्या नविन डी.आय.के.-७ जलवाहीनी टाकणे तसेच १०० मीमी व्यासाची Existing pipe line डी.आय.के.-७ स्थलांतरीत करणे या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या र.रू.२५,४३,२९३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ०४ :**

प्रस्ताव सादर करीत आहेत की, वार्ड क्र.११२ शिवाजीनगर अंतर्गत महानगरपालिका आरोग्य केंद्र ते इंदिरानगर पर्यंतच्या रस्त्याचे काम लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत रक्कम रू.३९,९८,९००/- एवढ्या रक्कमेस मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी पत्र जा.क्र./कावी/नपाप्र/२०१९/८० दि.०२/०३/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यतेचे आदेश दिलेले आहेत. तदनुषंगाने सदर कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एस.एस.आर. २०१८-२०१९ नुसार रक्कम रूपये ३९,९८,९००/- (१२ टक्के जी.एस.टी. सह) तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.१७/०१/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सदर कामाकरीता आर्थिक तरतुद ही लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत विकास कामामधुन मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी दि.०२/०३/२०१९ च्या पत्रान्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये ३९,९८,९००/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.११२ शिवाजीनगर अंतर्गत महानगरपालिका आरोग्य केंद्र ते इंदिरानगर पर्यंतच्या रस्त्याचे कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.३९,९८,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ०५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.१०३, वेदांतनगर अंतर्गत पदमपाणी कॉलनी येथे रस्त्याचे सिमेंट कॉँक्रीटीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक एसएसआर वर्ष २०१८-२०१९ नुसार रक्कम रू.३४,९६,१६२/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च लोकशाहीर अण्णाभाऊ साठे

नागरीवस्ती सुधार योजना सन २०१८-१९ अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधी मधुन करण्यात येणार असून प्रस्तावित कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्राप्त आहे.

करीता, प्रस्तावित कामाचे रक्कम रू.३४,९६,१६२/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०३, वेदांतनगर अंतर्गत पदमपाणी कॉलनी येथे रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.३४,९६,१६२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ०६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत असलेल्या १०० दललली योजना सन १९९२ साली कार्यान्वीत करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत १२१९ मीमी व्यासाची मुख्य एम.एस. जलवाहीनी जायकवाडी उद्भव ते नक्षत्रवाडी संतुलीत जलकुंभापर्यंत असून एम.बी.आर. ते शहरापर्यंत १४०० मीमी व्यासाची एम.एस. जलवाहीनी आहे. त्याचप्रमाणे सिडको भागासाठी १११९ मीमी व्यासाची जलवाहीनी सन २००१-०२ मध्ये कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. मुख्य जलवाहीन्या कार्यान्वीत होऊन २८ वर्षाचा कार्यकाळ झालेला आहे. मुख्य जलवाहीनी ही बहुतांश भागात जमीनीखाली असून सुमारे ४ किमी अंतरात ही जलवाहीनी उघड्यावर (नाल्याच्या ठिकाणी) टाकण्यात आलेली आहे. जलवाहीनी टाकतांना संरक्षण म्हणुन जलवाहीनीस इपॉक्सी पेंट देण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत इपॉक्सी पेंट कालमर्यादेमुळे विरळ झालेला असून बऱ्याच ठिकाणी रंग राहिलेला नाही. वातावरणामुळे व रंग नसल्यामुळे जलवाहीनी गंजुन गळती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. रस्त्यालगत असलेल्या गावांमध्ये बऱ्याच ठिकाणी जलवाहीनीवर भराव टाकून जलवाहीनी बुजविण्यात आलेली आहे. जलवाहीनीच्या बाजुला बहुतांश ठिकाणी रानटी झाडेझुडपे व काटेरी वनस्पती असून यामुळे देखील जलवाहीनीस हानी पोहचू शकते.

जलवाहीनीचे संरक्षण व्हावे तसेच आयुर्मान वाढावे याकरीता उघड्या असलेल्या जलवाहीनीस इपॉक्सी कलर देणे, बुजविण्यात आलेल्या जलवाहीनीस डांबरी कोटींग करणे व जलवाहीनीच्या लगत असलेली झाडे झुडपे व काटेरी वनस्पती तोडून जलवाहीनी मोकळी करणे गरजेचे आहे. याकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१८-१९ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.४०,७२,४८५/- इतकी आहे. सदरील काम जायकवाडी जलवाहीनी देखभाल दुरूस्ती या लेखाशिर्षकातून प्रस्तावित करण्यात आले आहे. करीता अंदाजपत्रक रक्कम रू.४०,७२,४८५/- चे मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत जायकवाडी उद्भव ते नक्षत्रवाडी संतुलीत जलकुंभापर्यंत असलेल्या १२१९ मीमी व्यासाची मुख्य एम.एस. जलवाहीनी तसेच एम.बी.आर. ते शहरापर्यंत असलेल्या १४०० मीमी व्यासाची एम.एस. जलवाहीनी त्याचप्रमाणे सिडको भागासाठी १११९ मीमी व्यासाची असलेल्या जलवाहीनीचे संरक्षण तसेच आयुर्मान वाढावे याकरीता उघड्या असलेल्या जलवाहीनीस इपॉक्सी कलर देणे, बुजविण्यात आलेल्या जलवाहीनीस डांबरी कोटींग करणे व जलवाहीनीच्या लगत असलेली झाडे झुडपे व काटेरी वनस्पती तोडून जलवाहीनी मोकळी करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.४०,७२,४८५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ०७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत प्रभाग कार्यालय-ड मधील निवडक सेवा पुस्तकांची व वैयक्तीक नस्तीची पडताळणी केली असता, श्री.के.बी.परदेशी, वरिष्ठ लिपीक

यांची कार्यालयीन आदेश क्र.आस्था-१/५९२८/८३, दि.०५/०८/१९८३ अन्वये कनिष्ठ लिपीक या पदावर रू.२६०-४९५ (सुधारीत वेतनश्रेणी ९५०-१५००) या वेतनश्रेणीत दि.०६/०८/१९८३ रोजी नियुक्ती झाली.

कार्यालयीन आदेश क्र.आस्था-१/२७३० दि.०८/०७/१९९८ नुसार दि.०९/०६/१९९४ पासून सात वर्षाच्या नियमित सेवेनंतर समय वेतनश्रेणी १४००-२३०० ही लागू करून रू.१४००/- इतके वेतन निश्चित केले व दि.०१/०६/१९९५ पासून पुढील वेतनवाढी मंजूर केल्या आहेत. त्यानुषंगाने पाचव्या वेतन आयोगानुसार १४००-२३०० साठी सुधारीत वेतनश्रेणी रू.४५००-१२५-७००० यामध्ये दि.०१/०१/१९९६ रोजी रू.४५००/- इतके वेतन निश्चित करून दि.०१/०६/१९९६ पासून पुढील वेतनवाढी मंजूर केल्या आहेत.

कार्यालयीन आदेश क्र.आस्था-१/२०१०/२९७ दि.२२/०२/२०१० नुसार दि.२२/०२/२०१० पासून वरीष्ठ लिपीक या पदावर वेतनश्रेणी रू.४५००-१२५-७००० सुधारीत वेतन बॅन्ड रू.५२००-२०२००+ ग्रेड वेतन रू.२८००/- यामध्ये प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली. त्यानुसार सुधारीत कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०१४/४४७ दि.०९/१०/२०१४ अन्वये दि.२०/०२/२०१० पासून खालीलप्रमाणे वेतननिश्चिती केले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्र.एएमसी-१४९९/२ प्र.क्र.१/नवि-२४, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२४ नोव्हेंबर १९९९ नुसार महानगरपालिका सेवाभरती नियमीत सात वर्षानंतरची पुढील वेतनश्रेणी देणेची तरतुद रद्द करून बारा वर्षानंतर पुढील वेतनश्रेणी देणेची तरतुद केली आहे. यास्तव औरंगाबाद महापालिकेने राज्य शासनाच्या तरतुदीप्रमाणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी सेवाभरती नियमात तशी तरतुद करणे आवश्यक राहील, असे नमुद केले आहे. तसेच दि.२४ नोव्हेंबर १९९९ रोजीच्या शासन निर्णयातील (२) (ब) मधील तरतुद शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयाच्या दिनांकापूर्वी देण्यात आलेली ७ वर्षाची निवडश्रेणी लागु राहील.

तसेच निवडश्रेणीमध्ये दिलेला लाभ हा पहिला लाभ समजण्यात येऊन वरिष्ठ वेतनश्रेणी दिल्यावर वेतननिश्चिती नियमित पदोन्नतीप्रमाणे होईल. मात्र त्याच वेतनश्रेणीत नियमित/कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा वेतननिश्चितीचा लाभ देय होणार नाही. ही बाब लक्षात घेता, श्री.के.बी.परदेशी यांची कार्यालयीन आदेश क्र.मनपा/लेखा/२०१४/४४७ दि.०९/१०/२०१४ अन्वये दि.२०/०२/२०१० पासून केलेले वेतननिश्चिती शासन निर्णय दि.०८/०६/१९९५ व दि.२१/०७/२००१ अन्वये चूकीची ठरते.

तरी सदरची वेतन निश्चितीमुळे खालील अदा झालेले अतिप्रदानाची रक्कम वसुल होणे आवश्यक असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| दिनांक | देय वेतन | अदा केलेले वेतन | शेरा |
|---|---|---|---|
| २२/०२/२०१० | १२४१०+२८०० | १३३४०+२८०० (*) | * दि.२२/२/२०१० पासून वरिष्ठ लिपीक या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळाल्याने रू.५२००-२०२००+२८०० या वेतन बँड मध्ये पुनश्चः वेतन निश्चीत करून अदा केलेले वेतन. शासन निर्णय दि.०८/०६/१९९५ व दि.२१/७/२००१ अन्वये अतिप्रदान रक्कम वसूल करणे योग्य राहील. |
| ०१/०७/२०१० | १२८७०+२८०० | | |
| ०१/०७/२०११ | १३३४०+२८०० | १३८३०+२८०० | |
| ०१/०७/२०१२ | १३८३०+२८०० | १४३३०+२८०० | |
| ०१/०७/२०१३ | १४३३०+२८०० | १४८५०+२८०० | |
| ०१/०७/२०१४ | १४८५०+२८०० | १५३८०+२८०० | |
| ०१/०७/२०१५ | १५३८०+२८०० | १५९३०+२८०० | |

करीता उपरोक्त बाबीचा विचार करता सदर लेखा परिच्छेद आक्षेप वगळण्याकरीता महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम-१९३० चे कलम-१० (१) मधील तरतुदीनुसार व मा.संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचे परिपत्रक क्र.स्था-१८/ब/८४७ दि.७ सप्टेंबर २०१५ व दि.२१ ऑक्टोंबर २०१६ अन्वये श्री.के.बी. परदेशी,वरिष्ठ लिपीक (सेवानिवृत्त) यांच्या वेतनश्चिती संदर्भातील लेखा परिच्छेद क्र.१०१ मधील अनुपालन अहवाल सादर करणेस मा.स्थायी समिती सभागृहाची मान्यता घेणेसाठी प्रस्ताव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.के.बी.परदेशी यांची कार्यालयीन आदेश क्र.मनपा/लेखा/२०१४/४४७ दि.०९/१०/२०१४ अन्वये दि.२०/०२/२०१० पासून केलेले वेतननिश्चिती शासन निर्णय दि.०८/०६/१९९५ व दि.२१/०७/२००१ अन्वये चूकीची ठरत असल्यामुळे तसेच लेखा परिच्छेद आक्षेप वगळण्याकरीता महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम-१९३० चे कलम-१० (१) मधील तरतुदीनुसार व मा.संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचे परिपत्रक क्र.स्था-१८/ब/८४७ दि.७ सप्टेंबर २०१५ व दि.२१ ऑक्टोंबर २०१६ अन्वये श्री.के.बी. परदेशी,वरिष्ठ लिपीक (सेवानिवृत्त) यांच्या वेतनश्चिती संदर्भातील लेखा परिच्छेद क्र.१०१ मधील अनुपालन अहवालानुसार कार्यवाही करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ०८ :**

श्री.काझी जावेद अहमद सिद्दीकी यांना कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/१९९९/१९४० दि.७/५/१९९९ अन्वये कार्यव्ययी आस्थापना (वर्क चार्ज इस्टॅब्लिशमेंट) वर ‘दुय्यम आवेक्षक’ म्हणुन वेतनश्रेणी रू.१४००-२३०० मध्ये तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात आली होती.

श्री.काझी जावेद अहमद सिद्दीकी यांना दुय्यम आवेक्षक या पदावर दि.७/५/१९९९ रोजी कार्यकारी अभियंता (स्लम) यांचेकडे रूजू करून घेण्यात आले होते. संबंधीतांची शैक्षणिक अर्हता ही Diploma in Civil Engineering अशी होती.

कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०००/१४३ दि.२७/३/२००० नुसार संबंधीतास दि.११/८/१९९९ ते दि.३१/३/२००० या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली. तसेच कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/ २०००/१४८ दि.२७/३/२००० अन्वये संबंधीतास दि.३१/३/२००० रोजी मध्यान्हानंतर कार्यमुक्त करण्यात आले.

याबाबत संबंधीताने मा.कामगार न्यायालय, औरंगाबाद येथे IDA १८/२००६ अन्वये याचिका दाखल केली होती. त्यानुषंगाने मा.कामगार न्यायालयाने दि.२६/१२/२०१३ रोजी निर्णय देवून संबंधीतास ‘दुय्यम आवेक्षक’ या पदावर ०२ महिन्यात नियुक्ती देणे बाबत आदेश दिले होते. तथापी मा.कामगार न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरूध्द महानगरपालिकेने मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.८७३१/२०१५ अन्वये अपिल दाखल केले असता, मा.उच्च न्यायालयाने सदरचे अपिल दि.१०/४/२०१७ रोजी खारीज करून मा.कामगार न्यायालयाने दिलेले आदेश कायम केले आहे.

त्यामुळे दि.८/११/२०१७ रोजी झालेल्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५४ (१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार मा.न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा अवमान होवू नये म्हणुन वयाची अट शिथिल करून मागील कोणतीही आर्थिक थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही या अटीवर तुर्त श्री.काझी जावेद अहमद सिद्दीकी यांची कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०१७/१४१० दि.८/११/२०१७ अन्वये ‘दुय्यम आवेक्षक’ या पदावर ‘खुला’ प्रवर्गात वेतनश्रेणी रू.५२००-२०२०० ग्रेड पे-२८०० व नियमानुसार मिळणाऱ्या भत्त्यावर प्रथम ०६ महिन्याकरीता नियुक्ती करून सदर नियुक्ती नियमित करण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यात येईल व मा.स्थायी समितीच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल असे आदेश काढण्यात आले आहेत. मा.कामगार न्यायालयाच्या निर्णयानुसार दि.८/११/२०१७ पासून ‘दुय्यम आवेक्षक’ या पदावर प्रथम ०६ महिन्याकरीता नियुक्ती देण्यात आलेली आहे. सदर कालावधी हा दि.७/५/२०१८ रोजी संपुष्टात आलेला आहे.

करीता श्री.काझी जावेद अहमद सिद्दीकी, ‘दुय्यम आवेक्षक’ या पदावर वेतनश्रेणी रू.५२००-२०२०० ग्रेड पे-२८०० व नियमानुसार मिळणाऱ्या भत्त्यावर तांत्रिक खंड देवून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) च्या परंतुकान्वये पुढील ०६ महिन्याकरीता तात्पुरती नियुक्ती देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.काझी जावेद अहमद सिद्दीकी, ‘दुय्यम आवेक्षक’ या पदावर वेतनश्रेणी रू.५२००-२०२०० ग्रेड पे-२८०० व नियमानुसार मिळणाऱ्या भत्त्यावर तांत्रिक खंड देवून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) च्या परंतुकान्वये दि.७/५/२०१८ पासून पुढील ०६ महिन्याकरीता तात्पुरती नियुक्ती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ०९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दि.२७/१२/२०१८ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समितीने पारीत केलेला ठराव क्र.१७३ अन्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-३ संवर्गातील कर्मचाऱ्यांना कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२०१८/१७०५ दि.२९/१२/२०१८ रोजीच्या आदेशान्वये दि.२८/११/२०१८ ते दि.२७/०५/२०१९ पर्यंत तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत मनपा आस्थापनेवरील वर्ग-३ संवर्गात खालील कर्मचारी कार्यरत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | पदनाम | कार्यरत विभाग | दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | गजानन आढाव | स्वच्छता निरीक्षक | घनकचरा व्यवस्थापन कक्ष | रु.५२५/- |
| २. | संजय महादू नंदन | पशुधन पर्यवेक्षक | प्राणि संग्रहालय विभाग | रु.५२५/- |
| ३. | राहूल नटवरलाल पटेल | मिश्रक | आरोग्य विभाग | रु.५२५/- |
| ४. | दत्ता सरोदे | कनिष्ठ लिपीक | इमारती व उद्यान बांधकाम विभाग | रु.५२५/- |
| ५. | राजू सुरडकर | कनिष्ठ लिपीक | इमारती व उद्यान बांधकाम विभाग | रु.५२५/- |
| ६. | शफीक शहाबाज रफीक खान | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड क्र.१ कार्यालय | रु.५२५/- |
| ७. | मो.मुसा मो.याकूब कुरेशी | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड क्र.२ कार्यालय | रु.५२५/- |
| ८. | प्रभु लक्ष्मण चव्हाण | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड क्र.५ कार्यालय | रु.५२५/- |
| ९. | विनोद वासेकर | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड क्र.५ कार्यालय | रु.५२५/- |
| १०. | विजय पाटील | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड क्र.७ कार्यालय | रु.५२५/- |
| ११. | कृष्णा ठोकळ | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड क्र.८ कार्यालय | रु.५२५/- |
| १२. | माधुरी शेंदूरकर | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड क्र.९ कार्यालय | रु.५२५/- |
| १३. | अखिल उर रहेमान | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड अभियंता क्र.१ कार्यालय | रु.५२५/- |
| १४. | मिलींद विठ्ठल गायकवाड | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड अभियंता क्र.१ कार्यालय | रु.५२५/- |
| १५. | राजेश पगारे | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड अभियंता क्र.४ कार्यालय | रु.५२५/- |
| १६. | राजेश पाटील | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड अभियंता क्र.९ कार्यालय | रु.५२५/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७. | विमल चोखाजी साठे | कनिष्ठ लिपीक | जनसंपर्क विभाग | रु.५२५/- |
| १८. | भारती जगताप | कनिष्ठ लिपीक | जनसंपर्क विभाग | रु.५२५/- |
| १९. | इकबाल जावेद रज्जाक | कनिष्ठ लिपीक | संगणक विभाग | रु.५२५/- |
| २०. | आनंद खरात | कनिष्ठ लिपीक | लेखा विभाग | रु.५२५/- |
| २१. | विजय हिवराळे | कनिष्ठ लिपीक | कार्य.अभि.(पा.पु.) विभाग | रु.५२५/- |
| २२. | मुक्तेश्वर लोखंडे | कनिष्ठ लिपीक | कार्य.अभि.(पा.पु.) विभाग | रु.५२५/- |
| २३. | विनोद साळवे | कनिष्ठ लिपीक | सिध्दार्थ जलतरण विभाग | रु.५२५/- |
| २४. | अफसर सिद्दीकी | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.५२५/- |
| २५. | संगिता थोरात | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.५२५/- |
| २६. | सुभाष धांडे | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.५२५/- |
| २७. | बी.के.गायकवाड | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.५२५/- |
| २८. | अलका नारायण बोरसे | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.५२५/- |
| २९. | अफजलुन्नीसा नहेरी बशीर शेख | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.५२५/- |
| ३०. | अशोक किसनराव जाधव | कनिष्ठ लिपीक | पाणी पुरवठा (वॉर्ड क्र.१,२,९) विभाग | रु.५२५/- |
| ३१. | रावसाहेब जावळे | कनिष्ठ लिपीक | प्राणि संग्रहालय विभाग | रु.५२५/- |
| ३२. | शेख महेबुब हुसेन | कनिष्ठ लिपीक | आरोग्य विभाग | रु.५२५/- |
| ३३. | अर्चना निकाळजे | संगणक ऑपरेटर | लेखा परीक्षण विभाग | रु.५२५/- |
| ३४. | जयश्री झाल्टे | संगणक ऑपरेटर | घरकुल कक्ष | रु.५२५/- |
| ३५. | पद्माकर जाधव | डार्करुम सहाय्यक | आरोग्य विभाग | रु.५२५/- |
| ३६. | आरेफ खान मसूद खान | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ३७. | भगीरथ जाधव | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ३८. | हरिश्चंद्र सोनवणे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ३९. | शेख फईमोद्दीन शेख बशीराद्दीन | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ४०. | मिलींद घाटे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ४१. | शेख रऊफ शेख माणिक | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४२. | महम्मद याहया खान | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ४३. | नजीर खान पठाण | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ४४. | जगदिश गायकवाड | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ४५. | प्रभु पवार | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ४६. | रमेश शिरसाठ | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ४७. | महादेव मिसाळ | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ४८. | शेख निजाम शेख दगडु | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ४९. | रंगनाथ बकले | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ५०. | गुलाम रसूल खान | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ५१. | रविंद्र पाटील | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ५२. | अरुण बोडखे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ५३. | सय्यद फरिदोद्दीन | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ५४. | सतिश जाधव | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ५५. | शेख जावेद शेख अमजद | देखरेख करण्यासाठी | छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय | रु.५२५/- |
| ५६. | सर्वेश नांद्रेकर | देखरेख करण्यासाठी | छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय | रु.५२५/- |
| ५७. | मोहम्मद रफीयोद्दीन | चित्रपट चालक | पशुधन विकास विभाग | रु.५२५/- |
| ५८. | रमेश शिंदे | प्लॅन्ट ऑपरेटर | सिध्दार्थ जलतरण विभाग | रु.५२५/- |

करिता उक्त कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (३) च्या परंतुकान्वये ०२ दिवसांचा तांत्रिक खंड देवून दि.३०/०५/२०१९ पासून पुढील सहा महिन्याकरिता तात्पुरती नियुक्ती देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-३ संवर्गातील प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.०१ ते ५८ (एकूण-५८,वर्ग-३ संवर्गातील कर्मचारी) कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (३) च्या परंतुकान्वये ०२ दिवसांचा तांत्रिक खंड देवून दि.३०/०५/२०१९ पासून पुढील सहा महिन्याकरिता तात्पुरती नियुक्ती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, यापुर्वी मा.स्थायी समिती सभेचा ठराव क्र.१३०, दि.०३/१२/२०१८ रोजी झालेल्या मा.स्थायी समिती सभेत आस्थापना विभागास दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेच्या दैनिक

वेतनावरील वर्ग-४ कर्मचाऱ्यांना कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-२/१४७७/२०१८, दि.२७/१२/२०१८ रोजीच्या आदेशान्वये दि.०२/०५/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत मनपा आस्थापनेवरील वर्ग-४ संवर्गातील खालील कर्मचारी कार्यरत आहे.

| **अ.क्र.** | **कर्मचाऱ्याचे नांव (सर्व श्री./श्रीमती)** | **पदनाम** | **कार्यरत विभाग** | **ठराविक/ दैनिक वेतन** |
|---|---|---|---|---|
| १) | मंदाबाई तुकाराम दांडगे | दै.वे.सेविका | महिला व बालकल्याण कक्ष | रु.४२४/- |
| २) | दिपक शेषराव दाभाडे | दै.वे.सेवक | का.अ.ड्रेनेज व विद्युत विभाग | रु.४२४/- |
| ३) | रविंद्र प्रभाकर देवकर | दै.वे.वॉचमन | मालमत्ता विभाग | रु.४२४/- |
| ४) | स.शहाबुद्यीन स.जकरुद्यीन | दै.वे.वॉचमन | मालमत्ता विभाग | रु.४२४/- |
| ५) | रमेश सखाराम जाधव | दै.वे.वॉचमन | मालमत्ता विभाग | रु.४२४/- |
| ६) | रविंद्र विठ्ठल कांबळे | दै.वे.सेवक | वाचनालय | रु.४२४/- |
| ७) | रमेश दत्तु देवडे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ८) | विनोद पांडुरंग तुपे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ९) | सुधाकर आसाराम त्रिभुवन | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| १०) | गोविंद कृष्णराव साळवे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ११) | संजय विठ्ठल इंगळे | दै.वे.सेवक | कर आकारणी विभाग | रु.४२४/- |
| १२) | समिंदर रमेश | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| १३) | प्रल्हाद गुंजाळे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| १४) | कडुबा औताडे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| १५) | मिलिंद दत्तोपंत आम्ले | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| १६) | सिध्दार्थ पांडुरंग दांडगे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| १७) | सतिश सोमाजी गडवे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| १८) | सर्जेराव शिंदे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| १९) | रामेश्वर फुलारे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| २०) | कमलबाई शिवन्ना गुडम | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| २१) | कमलबाई भिमराव साळवे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| २२) | रंजना तुळशीराम मोरे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु.४२४/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३) | लताबाई कारभारी घाटे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| २४) | इंदुबाई पांडुरंग दांडगे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| २५) | इंदुबाई राजुरे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| २६) | मंगलाबाई मिश्राम | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| २७) | चंद्रकला शंकर आम्ले | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| २८) | उषा सुनिल घोगरे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| २९) | संध्या श्याम साळवे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ३०) | सुनिता किसन साळवे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ३१) | मलेका शाहीन शे.जलील अहेमद | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ३२) | यशोधरा नामदेव वसाटे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ३३) | विद्या मनोहर शेळवणे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ३४) | छायाबाई अशोक म्हस्के | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ३५) | शारदाबाई दलबहादुरसिंग ठाकुर | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ३६) | राजेश प्रभाकर पवार | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ३७) | चंद्रमणी समाधान गवई | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ३८) | रावसाहेब जाधव | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ३९) | कुंदन काशिनाथ गणोरे | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ४०) | मनोज लखनलाल तुळशीबागवाले | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ४१) | रविंद्र खापे | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ४२) | प्रल्हाद विठ्ठल करडे | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ४३) | साहेबराव मुक्ताजी गायकवाड | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ४४) | विजय पंडीतराव गायकवाड | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ४५) | अय्युब खाँ सांडू खाँ | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ४६) | रमेश चंद्रय्या परके | दै.वे.वि.लाईनमन | विद्युत विभाग | रु.५२५/- |
| ४७) | अण्णासाहेब दाणे | दै.वे.वि.लाईनमन | उपअभियंता पा.पु. | रु.५२५/- |
| ४८) | कैलास श्रीपत बनकर | दै.वे.वि.लाईनमन | विद्युत विभाग | रु.५२५/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४९) | असलम खान मुकीद खान | दै.वे.मजुर | निवडणूक विभाग | रु.४२४/- |
| ५०) | इलियास अ.बसरावी | दै.वे.मतदनीस | यांत्रिकी विभाग | रु.४२४/- |
| ५१) | मो.युसुफ मो.उस्मान | दै.वे.मतदनीस | यांत्रिकी विभाग | रु.४२४/- |
| ५२) | शेख इम्रान शेख फजलोद्दीन | कक्ष सेवक | आरोग्य विभाग | रु.४२४/- |
| ५३) | म.गयासोद्दीन सलामोद्दीन | कक्ष सेवक | आरोग्य विभाग | रु.४२४/- |
| ५४) | विमलबाई भुईगड | सेविका | आरोग्य विभाग | रु.४२४/- |
| ५५) | राजेंद्र दिनकर कुंभारीकर | प्रशोग शाळा सहाय्यक | आरोग्य विभाग | रु.५२५/- |
| ५६) | सौ.जयश्री वसंत जोशी | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु.५२५/- |
| ५७) | विलास दत्तु नाईक | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु.५२५/- |
| ५८) | सुरेश दामोधर नलावडे | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु.५२५/- |
| ५९) | श्रीमती जिजाबाई नवगिरे | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु.४२४/- |
| ६०) | श्रीमती पार्वता दाडेकर | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु.४२४/- |
| ६१) | भरत पचलोरे | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु.५२५/- |
| ६२) | सुभाष दत्तात्रय सुरासे | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु.५२५/- |
| ६३) | मुंढे भानुदास नरसू | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु.५२५/- |
| ६४) | कमल कचरु मोरे | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु.५२५/- |
| ६५) | भोसले पंढरीनाथ देवीदास | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु.५२५/- |
| ६६) | नारायण शेषराव जंगले | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु.५२५/- |
| ६७) | वाचा सुंदर संतोष | दै.वे.नोंदणी लिपीक | प्रभाग क्र.८ | रु.५२५/- |
| ६८) | निकम शांताराम नारायण | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु.५२५/- |
| ६९) | तनवीर खान नियाजी | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु.४२४/- |
| ७०) | शेख हबीब लाल | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु.५२५/- |
| ७१) | मनिषा किसनराव पाटील | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु.५२५/- |
| ७२) | फिरोज खान गणी खान | दै.वे.वॉर्डबॉय | आरोग्य विभाग | रु.४२४/- |
| ७३) | मोहमंद सज्जाद सईद अन्सारी | दै.वे.वॉर्डबॉय | आरोग्य विभाग | रु.४२४/- |
| ७४) | परवेज अण्णाजी मिसाळ | दै.वे.वॉचमन | आरोग्य विभाग | रु.४२४/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७५) | युवराज लांडगे | दै.वे.सेवक | आरोग्य विभाग | रु.४२४/- |
| ७६) | सौ.निरु कृष्णा गवल | दै.वे.सेविका | आरोग्य विभाग | रु.४२४/- |
| ७७) | जाधव सखुबाई शंकर | दै.वे.सेविका | आरोग्य विभाग | रु.४२४/- |
| ७८) | गायकवाड मिना गणपत | दै.वे.सेविका | आरोग्य विभाग | रु.४२४/- |
| ७९) | वाघ सखुबाई आसाराम | दै.वे.सेविका | आरोग्य विभाग | रु.४२४/- |
| ८०) | काळे मिनाबाई काशिनाथ | दै.वे.सेविका | आरोग्य विभाग | रु.४२४/- |
| ८१) | फुले धुरपताबाई सांडू | दै.वे.सेविका | आरोग्य विभाग | रु.४२४/- |
| ८२) | फिरंगी लिला नरसिंग | दै.वे.सेविका | आरोग्य विभाग | रु.४२४/- |
| ८३) | कांबळे शोभा साहेबराव | दै.वे.सेविका | आरोग्य विभाग | रु.४२४/- |
| ८४) | के.डब्ल्यु.पोपलवार | दै.वे.सेविका | आरोग्य विभाग | रु.४२४/- |
| ८५) | विजय गोविंद साबळे | प्रयोगशाळा सहाय्यक | आरोग्य विभाग | रु.५२५/- |
| ८६) | दिलीप श्रीधर ठोंबरे | दै.वे.मजुर | अग्निशमन विभाग | रु.४२४/- |
| ८७) | बाबासाहेब रंजाजी कांबळे | दै.वे.हमाल | प्रभाग क्र.६ | रु.४२४/- |
| ८८) | राजेश दिपचंद लाहोट | दै.वे.स्वीपर | प्रभाग क्र.२ | रु.४२४/- |
| ८९) | किशोर विनायक साबळे | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.२ | रु.४२४/- |
| ९०) | नदिम अख्तर | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.२ | रु.४२४/- |
| ९१) | विष्णू नारायण काळे | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.२ | रु.४२४/- |
| ९२) | मिर्झा अन्वर बेग | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.२ | रु.४२४/- |
| ९३) | फेरोज अहमद मुस्ताफ अ.खान | दै.वे.वॉचमन | प्रभाग क्र.२ | रु.४२४/- |
| ९४) | गणेश साहेबराव उजगरे | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.९ | रु.४२४/- |
| ९५) | अनिल येडूबा साळवे | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.९ | रु.४२४/- |
| ९६) | लताबाई अशोक साळवे | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.९ | रु.४२४/- |
| ९७) | संजय शामराव ठोंबरे | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.९ | रु.४२४/- |
| ९८) | मोहमंद मुदस्सीर शेख बशीर | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.६ | रु.४२४/- |
| ९९) | शेख जावेद शे.जाफर | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.६ | रु.४२४/- |
| १००) | राजु चंद्रभान बढे | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.६ | रु.४२४/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०१) | द्वारकाबाई नाना अडागळे | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.९ | रु.४२४/- |
| १०२) | चतुराबाई भिमराव हतागळे | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.६ | रु.४२४/- |
| १०३) | रविंद्र शामसुंदर कांबळे | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.७ | रु.४२४/- |
| १०४) | संजय रतन खरे | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.७ | रु.४२४/- |
| १०५) | किशोर खुशाल रामटेके | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.७ | रु.४२४/- |
| १०६) | अतुल हरीचंद्र फुलके | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.७ | रु.४२४/- |
| १०७) | शोभाबाई दिलीप साळवे | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.७ | रु.४२४/- |
| १०८) | जाईबाई साहेबराव साळवे | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.८ | रु.४२४/- |
| १०९) | हौसाबाई रामभाऊ वडमोर | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.७ | रु.४२४/- |
| ११०) | मिनाबाई दामोधर सोनवणे | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.७ | रु.४२४/- |
| १११) | पुष्पाबाई जानकु त्रिभुवन | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.८ | रु.४२४/- |
| ११२) | सावित्रीबाई भगवान मगरे | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.७ | रु.४२४/- |
| ११३) | कांताबाई अंबादास पटेकर | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.८ | रु.४२४/- |
| ११४) | विजय लक्ष्मणराव देशपांडे | दै.वे.वॉचमन | भारत माता मंदिर (सांस्कृतिक विभाग) | रु.४२४/- |
| ११५) | सुनिल किसनराव दाभाडे | दै.वे.वॉचमन | प्रभाग क्र.६ | रु.४२४/- |
| ११६) | सतिश केशव बनकर | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| ११७) | राजेंद्र भागाजी नवगिरे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| ११८) | मिलींद धनाजी गायकवाड | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| ११९) | बालसिंग भोपाल कणसे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| १२०) | किशोर मोतीराम उगळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| १२१) | राजेश नाथाजी गवळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| १२२) | रावसाहेब हरीभाऊ मगरे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| १२३) | बाळकृष्ण कचरु भारसाखळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| १२४) | सुरेश नामदेव खरात | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| १२५) | कैलास पांडुरंग वाणी | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२६) | संतोष गोविंद जंगे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| १२७) | वैजिनाथ देवराव साबळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| १२८) | सुनिल दौलत अंभोरे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| १२९) | बाबासाहेब भाऊराव भारसाखळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| १३०) | छगन तुळजाराम सलामपूरे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| १३१) | सुभाष बाबुलाल हरणे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| १३२) | बबन पंडीतराव जाधव | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| १३३) | राधाकिसन फकीरचंद बकले | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| १३४) | वाजीद खान मन्सूर खान | दै.वे.सेवक | वाचनालय | रु.४२४/- |
| १३५) | इम्रान उल्ल खान फैज उल्ला | दै.वे.सेवक | वाचनालय | रु.४२४/- |
